# आरती श्री रामाची

जय देव जय देव जय रामराया
आरती ओवाळू कौसल्यातनया
जय देव जय देव ॥धृ.॥

दशरथपुत्र तू रघुकुलभूषण
सवे सीतामाई बंधू लक्ष्मण
चौऱ्या ढाळीती भरत शत्रुघ्न
सेवातत्पर सदा समोर हनुमंत
जय देव जय देव ॥१॥

पितृवचनासाठी भोगी वनवास
प्रजेसाठी त्यागी प्रिय पत्नीस
धर्मासाठी करी राक्षससंहार
भक्तांसाठी परी करूणा अपार
जय देव जय देव ॥२॥

आदर्श भ्राता पति पिता पूत
एकवचनी तू देवाधिदेव
पूर्णब्रह्म तूही हे केवळ सत्य
नम्र तुझ्या पायी कळस आदित्य
जय देव जय देव ॥३॥

- नारायण
१०/०७/९५
(अमेरिका)

ॐ
सीतावर रामचंद्र की जय।
पवनसुत हनुमान की जय।
उमापती महादेव की जय।

गोपालकृष्ण महाराज की जय ।
अंबामाता की जय ।
हरि: ॐ ।

ॐ
कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानां ।
पाथेयं यन्मुमुक्षो: सपदपरिपदप्राप्तये प्रस्थितस्य ॥
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानां ।
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥

जय जय रघुवीर समर्थ ।